# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## अंतर्गत

समाजकार्य विद्याशाखेतील पी.एच.डी पदवीसाठी सादर करावयाचा

संशोधन आराखडा

**संशोधन विषय**

# वंचित विधवा स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा चिकित्सक अभ्यास

# (विशेष संदर्भ - लातूर जिल्हा)


**संशोधक**

दत्ता कल्लाप्पा करंडे

(एम.एस.डब्ल्यु.,एम फिल,नेट,सेट)

**मार्गदर्शक**

**डॉ. संजय दुर्वासराव गवई**

सहयोगी प्राध्यापक तथा संशोधक पर्यवेक्षक

समाजकार्य विभाग

**महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर**

**प्रस्तावना :-**

प्राचीन काळापासुन विधवा स्त्रियांचे प्रश्न गंभीर होते आणि त्या संदर्भात कायदे, सुधारणा चळवळी झाल्या आहेत तरी आजही विधवा स्त्रियांचे प्रश्न संपलेले नसून त्यांना आज ही अनेक प्रश्नाला सामोरे जावे लागते. भारतीय धर्मशास्त्रे व नीतितनियम यांनुसार विधवेला पतीच्या मरणास कारणीभूत धरल्याने, ती पापी व अमंगल आहे ही समाजाची धारणा बनली. तिने कुटूंबातील मंगल प्रसंगी उपस्थित राहू नये असा प्रघात पडला. विधवा स्त्रीने सुतक किती दिवस पाळावे, या काळात तिने कुटूंबातील मंगल प्रसंगी उपस्थित राहू नये, असा प्रघात पडला. विधवा स्त्रिने सुतक किकती पाळावे, या काळात तिने कोणते वस्त्र परिधान करावे, तिने घराबाहेर पडावे की नाही, तितने कोणशी बोलावे, कोणते अन्न किती वेळा ग्रहण करावे यांबद्यलही विविध समाजांत विभिन्न बंधने विधवे लादलेली दिसुन येतात. पतिनिधनाचे पातक धुऊन काढण्याकरिता अगर प्रायश्चित्त म्हणून ही बंधने तिने पाळलीच पाहिजेत, असा समाजाचा दंडक असे. असे हिंदू समाजात धर्मसूत्रे आणि मनुस्मृती यांनुसार विधवेच्या दैनंदिन व्यवहारांवर कडक बंधने घातलेली आढळतात. विधवा स्त्रियांचे कुटूंब, नातेसंबंध  व समाजातील स्थान व दुय्यमत्वाची स्थिती कायम असल्यामुळे हा  प्रश्न गंभीर बनला आहे. विधवांचे प्रश्न हे आधुनिक समाजात पुरोगामी व विचारसरणी व अनुकूल कायदे यांमुळे काही अंशी सौम्य बनले. असले, तरी कोणत्याही समाजात स्त्रीच्या दृष्टीने तिच्या पतीचे निधन ही मोठी दुदैवी आपत्ती ठरते, कुटुंबातील पतीच्या निधनामुळे स्त्रीचे व पिताच्या निधनामुळे मुलाचे आयुष्य बदलून जाते. आई मुले, नातेवाईक,व इतर संबंधीत व्यक्तीचे आपापसांतले संबंध व अपेक्षा यांमध्ये अनेक फेरबदल व फेररचना घडून येतात, विधवा स्त्रिला आर्थिक ताण तर सोसावे लागतातच, शिवाय मुलांच्या पालन पोषणानचा भारही तिलाही सोसावा लागतो. तरुण विधवेला माणसिक ताण, शारिरीक कुचंबना व पुरुषांकडुन मान हाणी सहन करावी लागते पाश्चत्य समाजात देखील विधवा स्त्री कुटूंबापासून दूरावली जाते व तीला एकाकी पणा व असुरक्षीतता या प्रश्नांशी सामना करावा लागतो.

विधवा स्त्री ज्या विशिष्ट समाज व्यवस्थेत वावरते तो समाज, त्यातील स्थानीक गट व आर्थिक स्तर या नुसार तिच्या समस्या भिन्न रुपे धारण करतात. अविकासीत व विकसनशील देशात स्त्रियांना शिक्षण रोजगार व कायदेशीर हक्काची जाणीव कमी प्रणात असल्याने, पती निधनामुळे विधवेचे जीवन अत्यंत कष्टप्रद बनते. वृध्द विधवांचे प्रश्न आज अनेक विकसींत देशातही गंभीर स्वरुपाचे बनले आहे.

जगातील अनेक देशामध्ये विधवांचे प्रमाण विधुरांपेक्षा जास्त असल्याचे आढळुन आले आहे. सहजीकच एकाकी निराधार स्त्रियांचे प्रमाण समाजात आधिक आहे. तेंव्हा विधवांना अशा आपत्ती तोंड देण्याकरीता कुटूंब, स्नेही, व सेवाभावी संस्था यांची मोठया प्रमाणात गरज भासते. वृध्द आश्रमांमध्ये निराधार विधवांची व्यवस्था कांही प्रमाणात होत असली तरी , हा प्रश्न फक्त कायद्याने व संस्था स्थापन करुन सुटणार नाही हे ही खरे आहे. विधवांना सेवाभावी संस्थाचा आश्रय, कौटुबीक आधार व त्यातुन लाभणारी सामाजिक सुरक्षीतता याची सर्वांत जास्त आवश्यकता भासत आसल्याने, त्यादृष्टीने स्त्रीयाकरीता असलेल्या सवलती व तरतुदी यांचे नियोजन करताना, विधवांच्या प्रश्नांना अग्रक्र म देणे महत्वाचे ठरते.

**संशोधन पध्दती :-**

**संशोधन विषयाची निवडः-**

आज ही विधवा स्त्रियांचे प्रश्न संपलेले नसुन त्यांना आज ही विविध समस्यांना सामोरे जावे लागते. विधवा स्त्रियांचे कुटूब व नाते संबंध व समाजातील स्थान व दुय्यमत्वाची स्थीती कायम असल्यामुळे ही समस्या अधिक गंभीर बनली आहे. विधवांच्या संदर्भात शासकीय योजना , कायदे, सवलती व तरतुदी यांचे नियोजन करताना विधवांच्या प्रश्नांना अग्रक्र म देणे महत्वाचे आहे असे वाटते तेव्हां वंचित विधवा स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या उद्‌देशाने  प्रस्तूत संशोधन विषयाची निवड केलेली आहे.

**संशोधनाचे उद्‌दिष्टे :-**

प्रस्तूत संशोधनात विषयाच्या अनुषंगाने पुढील उद्‌दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. लातूर जिल्हयातील वंचित विधवा स्त्रियांची सांख्यकीय आकडेवारी जाणून घेणे.

२. लातूर जिल्हयातील वंचित विधवा स्त्रियांचा सामाजिक दर्जा समजुन घेणे.

३. लातूर जिल्हयातील वंचित विधवा स्त्रियांची आर्थिक स्थिती अभ्यासने.

४. लातूर जिल्हयातील वंचित विधवा स्त्रियांचे सध्या नेमके प्रश्न, समस्या व त्याचे दुष्परिणाम कोणते आहेत ते समजून घेणे.

५. शासकीय व अशासकीय संस्थांची वंचीत विधवा स्त्रियांच्या संदर्भातील भूमीका समजून घेणे.

**संशोधनाचे गृहीतकृत्ये :-**

१. वंचित विधवा स्त्रियांचा सामाजिक दर्जा खालावलेला आहे.

२. वंचित विधवा स्त्रियांकडे उपजीवीकेचे अपुरे साधन उपल्बध असल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती अत्यंत खालावलेली आहे.

३. सासर आणि माहेर या दोन्ही कुटूंबाकडून वंचितता वाटयाला आलेली असते.

४. शासनाची विधवा स्त्रियांच्या संदर्भातील तरतूदी तुटपूंज्या स्वरुपात आहेत.

**संकल्पनीकरण :** -

वंचित :- आर्थिक व सामाजिकदृष्टया बहिष्कृत किंवा त्यापासून दूर राहिलेले म्हणजे वंचित.

विधवा :- जिचा पती निधन पावला आहे व जिने पुन्हा लग्न केलेले नाही अशी स्त्रि म्हणजे विधवा होय.

**संशोधन विषयाचे क्षेत्र: -**

वंचित विधवा स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी संशोधकाने लातूर जिल्हयाची निवड केली असुन लातूर जिल्हयातील दहा तालूक्यातील वंचित विधवा स्त्रियाना संशोधन अध्ययनासाठी निवडलेले आहे.

**संशोधन आराखडा : -**

संशोधनाचे उद्‌दिष्टे प्राप्त करणे साठी व संशोधनाला सुयोग्य दिशा देण्यासाठी संशोधन आराखडा केला जातो. संशोधन विषयाचा विचार पूर्वक अंदाज घेवुन आराखडयाचे स्वरुप निश्चित करावे लागते त्यामुळे संशोधनात आराखडयाला विशेष महत्व आहे. प्रस्तुत संशोधनाचा विषय वंचित विधवा स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक समस्यांचा चिकित्सक अभ्यास – विशेष संदर्भ लातूर जिल्हा हा असल्याने प्रस्तुत अध्ययनात विश्लेषनात्मक व वर्णनात्मक संशोधन आराखाडा या पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. त्या आधारे संशोधनाची दिशा ठरवुन तथ्य संकलना साठी अध्ययन केले जावून त्याआधारे मिळवलेल्या माहितीचे वर्गीकरण करुन निष्कर्ष काढले जातील

**नमुना निवडः-**

संशोधन नमुना जर प्रतिनिधीक व योग्य असेल तर निष्कर्ष देखील सुयोग्य राहतात म्हणून संशोधनाची सार्थकतेकरीता प्रतिनिधीक नमुन्याची आवश्यकता असते म्हणून संशोधन विषयामध्ये गैर संभाव्यता नमुना निवडीतील सहेतूक नमुना निवड पध्दतीचा वापर करुन तथ्य संकलन केले जाईल त्यासाठी संशोधन क्षेत्रातील २०० एककाची सदरील संशोधकाची नमुना म्हणून निवड करण्यात येईल.

**तथ्य संकलन पध्दती: -**

सामाजिक संशोधनात तथ्य व स्त्रोत महत्वाची असतात तथ्य व साधनांच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी दोन प्रकाराच्या तथ्य संकलन स्त्रोताचा उपयोग करण्यात येणार त्यामध्ये प्राथमिक स्त्रोत व द्वितीयक स्त्रोत यांचा समावेश होतो.

**प्राथमिक स्त्रोतः-**

यामध्ये प्राथमिक स्त्रोत प्रत्यक्ष सहभागी निरीक्षणे व मुलाखत-अनुसूची या स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे संशोधनाचे उद्देश व गृहीतकृत्ये समोर ठेवुन मुलाखत-अनुसूची बनवली जाईल व त्यानुसार वस्तूनिष्ठ माहिती मिळवण्यासाठी उपयोगात आणले जाईल.

**द्वितीयक स्त्रोतः -**

या विषयाशी संबंधीत संशोधनपर लेख, संदर्भ ग्रंथ, मासीके, पुस्तके, साप्ताहीके, दैनीके, विशेषांक, शासन आहवाल, शोध पत्रीका, यांसंबंधीत विविध संकेत स्थळे, इत्यादींचा आधार घेतला जाईल.

**तथ्यांचे वर्गीकरण : -**

संशोधनासाठी संशोधक जी तथ्य संकलीत करतो ती अस्पष्ट, विस्तृत व आस्ताव्यस्त स्वरुपात असतात. अशा विस्तृत व विखूरलेल्या तथ्यांच्या आधारे विश्लेषण करणे कठिण कार्य असते. तथ्यांचे निर्वचन सुलभतेने होण्यासाठी समजण्यायोग्य सारख्या आधारावर तथ्यांचे गट पाडणे म्हणजे वर्गीकरण किंवा श्रेणीकरण होय. तथ्यांचे विश्लेषन करणे सुलभ व्हावे यासाठी तथ्यामधील समान किंवा असमान बाबी कोणत्या आहेत. हे निश्चित करावे लागते म्हणजेच तथ्यांचे निश्चित प्रकार किंवा वर्ग पाडण्यासाठी कांही आधार निवडावे लागतात त्यामुळे विखुरलेले तथ्या एका निश्चित स्वरुपाच्या प्रकारात किंवा वर्गात स्पष्ट होउ लागतात. तेंव्हा प्रस्तूत संशोधनात तथ्यांचे वर्गीकरणाचा योग्य प्रकारे उपयोग केला जाईल.

**तथ्यांचे विश्लेषण व निर्वाचन : -**

तथ्यांचे विश्लेषण व निर्वाचन केल्याशिवाय अध्ययनातून निष्कर्ष काढणे शक्य होणार नाही. विश्लेषणांची परिणीती जर सामान्य स्वरुपाच्या निष्कर्षाच्या मांडणीत होत असेल तर संशोधन कर्त्यास हे जाणून घ्यावयाचे असते की त्यांनी काढलेल्या निष्कर्षाचा वास्तवीक अर्थ काय होतो अथवा या निष्कर्षामधून काय  प्रतिबिंबीत होते, निर्वाचन हेच जाणून घेण्याचा एक मार्ग असल्याने  खर्या अर्थाने निर्वाचन खेरीज विश्लेषणाच्या कार्याची सांगता होत नाही यामध्ये केंद्रीय प्रवृत्तीची मापके, सरासरी, टक्केवारी, सहसंबंध  या तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. विश्लेषनाबरोबरच निर्वाचनाचाही अवलंब करण्यात येईल.

**निष्कर्ष व निष्कार्षाचे  निर्वाचन : -**

संशोधनातील निष्कर्ष व निर्वाचन ही शेवटी येणारी पायारी आहे संशोधानाच्या माध्यामातून जे कांही तथ्य प्राप्त होतात, त्याचे विश्लेषण व निर्वाचन झाल्यानंतर त्याचे संक्षिप्त स्वरुपात जे तथ्य बाहेर येतात त्यात निष्कर्ष असे म्हणतात, प्राप्त झालेल्या निष्कर्षाचे विवेचन किंवा प्रस्तूती करण करण्याचे काम संशोधकाला करावयाचे आहे तेंव्हा निष्कर्षाचे निर्वाचन झाल्यानंतर संशोधक गृहीकृत्याची पडताळणी करुन कोणते गृहीकृत्य सत्य व असत्य ठरले आहेत याची शाहानिशा करण्यासाठी संशोधनात गृहीकृत्याचा पडताळा करण्यात येणार आहे.

**संशोधन मर्यादा : -**

प्रस्तूत संशोधनासाठी वंचित विधवा स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक समस्यांचा चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे त्यासाठी लातूर जिल्हा हे कार्यक्षेत्र निवडले आहे जिल्हयातील दहा तालूक्यातील विधवामहिलांच्या उपलब्धतेनुसार आणि नमुना म्हणून निवडलेल्या उत्तरदात्यांने दिलेल्या महितीच्या सत्यतेवर व या संशोधनातील विश्लेषनावर अवंलबून राहिल.

**संशोधन कालावधी : -**

सदरील संशोधनाचा कालावधी हा इ. स. २०१९ ते २०२४ या कालावधीमध्ये संशोधन अध्ययन करण्यात येणारे आहे.

**प्रकरणाची रुपरेषा :-**

| | |
|---|---|
| प्रकरण पाहिले :- | **प्रस्तावना** |
| प्रकरण दुसरे :- | **साहित्याचा आढावा** |
| प्रकरण तिसरे :- | **संशोधन पध्दती** |
| प्रकरण चौथे :- | **तथ्य विश्लेषण व निर्वाचन** |
| प्रकरण पाचवे :- | **व्यष्टी अध्ययन** |
| प्रकरण सहावे :- | **निष्कर्ष, सारांश आणि शिफारशी** |
| | **परिशिष्टे :- मुलाखत - अनुसूची** |
| | **संदर्भ ग्रंथसुची** |

**संदर्भग्रंथ सुची :-**


१. रा.ना. घाटोळे २००९-२०१० - समाजशास्त्रीय संशोधन पध्दती व तत्वे, मंगेश प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती.

२. संशोधन पध्दती १९८१ - महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, प्रा.पु.ल.भांडारकर

३. स्वाती देहाडराय , अनघा तांबे २०१० - स्त्रियांची सामाजिक सक्षमीकरण – क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, स्त्री आभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे

४. मालसे, स.गं., आपटे, नंदा विधवा विवाह चळवळ (१८००-१९००) मुंबई, १९७८.

५. विद्यासागर, इश्वरचंद्र, अनुपंडीत, विष्णू परशुराम शास्त्री , विधवा विवाह, मुंबई १८६५.

६. Altekar, A.S. The Position of Women in Hindu Civilization., Delhi, 1962.

७. Dandavate, Pramila., Ranjankumari., Verghese., amila., Widows, Abondonedand Destitute Women In India, Delhi, 1989.

८. Sharma, Vijay, Protection to women in matrimonial Home, Delhi,1994.



**संशोधक**

दत्ता कल्लाप्पा करंडे
(एम.एस.डब्ल्यु.,एम फिल,नेट,सेट)

**मार्गदर्शक**

**डॉ. संजय दुर्वासराव गवई**
सहयोगी प्राध्यापक तथा संशोधक पर्यवेक्षक
समाजकार्य विभाग
**महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर**